MA-I , सेम. 2 , Paper - 3

# आंतरराष्ट्रीय संबंध

प्रा. रवि जनबंधु

## शीतयुद्ध

द्वितीय महायुद्धाची आग विझते न विझते तोच इ.स. १९४६ मध्ये शीतयुद्धाला प्रारंभ झाला. त्या वेळेपासून ह्या नवीन स्वरूपाच्या युद्धाने आंतरराष्ट्रीय राजकारणाला प्रभावित केले. लोकशाही व्यवस्था सर्व देशामध्ये रुजू करण्यासाठी आणि मजबूत करण्यासाठी इंग्लंड आणि अमेरिकेने संघटना उभारली पाहिजे, असे मत मांडले.

त्याची योग्य प्रतिक्रिया अमेरिकेत उमटली आणि रशियाविरोधी वातावरण अमेरिकेत तयार झाले. वस्तुत: शितयुद्धाला इ. स. १९१७ मध्ये रशीयातील झालेल्या क्रांतीनंतरच प्रारंभ झाला ब्रिटनने त्यावेळेपासून साम्यवादाला नष्ट करण्याचे प्रयत्न प्रारंभ केलेले होते. परंतु शीतयुद्धाची मुख्यत्वेकरुण सुरवात द्वितीय महायुद्धानंतर मानली जाते.

शीतयुद्ध म्हणजे सत्तेसाठी चाललेली स्पर्धा होय शीतयुद्ध हा एक मनोवैज्ञानिक संघर्ष आहे. जागतिक राजकारणावर प्रभाव पाडणे व जगाचे नेतृत्व करणे हा शितयुद्धाचा उद्देश समजला जातो. बडी राज्ये अनेक मार्गाने दाखवण्याचा प्रयत्न करतात. प्रत्येक गट नि:शस्त्रीकरणाची भाषा बोलत असतात. परंतु नवनवीन शस्त्रास्त्रांची निर्मिती करुण प्रतीस्पर्धी गटाला दाखवण्याचा प्रयत्न करतात. तसेच अलिप्त राष्ट्रांना मदत करुन त्यांना आपल्या गटाकडे ओढण्याचा प्रयत्न चालू असतो.

## शीतयुद्धाची शिथिलता

१९५३ सालानंतर शितयुद्धाची शिथिलता निर्माण झाली

Page No:
Date:

1) नेतृत्वात बदल :⇒

शीतयुद्धाची शिथिलता १९५३ नंतर शीतयुद्धाची तीव्रता कमी झाली, ह्याचे कारण शीतयुद्धाचे प्रणेते राष्ट्राध्यक्ष ट्रुमन आणि पंतप्रधान स्टॅलीन ह्याचे नेतृत्व समाप्त झाले. त्या दोघांनाही तिसरे महायुद्ध निर्माण झाल्यास जगाचा सर्वनाश होईल, अशी साधार भिती वाटली. त्यानंतर रशियात बुल्गानिन नंतर ख्रुश्चेव पंतप्रधान झाले.

2) जिनेव्हा संमेलन :⇒

१९५५ साली रात्नयाला प्रारंभ झाला आणि जिनेव्हा येथे शिखर संमेलन भरले. ह्या संमेलनात महाशक्तीच्या राष्ट्रांनी अण्वस्त्राचा उपयोग युद्धासाठी करावयाचा नाही असा निर्णय घेऊन शितयुद्धात शिथिलता आणली

3) अलिप्तता गटाची निर्मीती :⇒

ह्याच काळात नव्याने स्वतंत्र्य झालेल्या काही राष्ट्रांनी कोणत्याही सत्ता गटात सामील न होण्याचा निर्णय घेतला आणि स्वतान्त्र अलिप्त वादी गट निर्माण केला, त्याचा परीनाम म्हणून शितयुद्धात शिथीलता आली.

4) नवोदित राष्ट्राची जागृती :⇒

आशिया आणि आफ्रिका खंडातील नवोदित राष्ट्रांनी कोणत्याही सत्तागटात सामील न होता स्वतंत्र्य असा अलिप्ततावादी गट निर्माण केला आणि साम्राज्यवाद आणि वसाहतवादाला विरोध करण्याचे धोरण स्वीकारून आपल्या अलिप्तवादाची शक्तीचा उपयोग जागतीक शांतता व सुव्यवस्था प्रस्थापीत करण्यासाठी केला नवोदित राष्ट्राच्या ह्या जागृतीमुळे शीतयुद्धाची शिथीलता कमी झाली.

Scanned with CamScanner

# शीतयुद्धाचे जागतीक परीणाम

1) जगाचे द्विध्रुवीकरण :⇒ हे शीतयुद्ध म्हणजे अमेरिका आणि सोव्हिएट रशीयातील संघर्ष होय. या संघर्षात दोन्ही राष्ट्रे आपल्या आत्ता गटात सामील करुन घेण्या साठी प्रभाव आणि शक्ती वाढवण्याचे सतत प्रयत्न करीत आहे. त्यामुळे संपूर्ण जगातील राष्ट्रांचे द्विध्रुवीकरण झाले.

2) क्षेत्रीय संघटनांची निर्मिती :⇒ आपला प्रभाव वाढवण्यासाठी महाशक्तींची राष्ट्रे नाटो, सीटो, सेन्टो, बगदाद पॅक्ट, वगैरेसारख्या क्षेत्रीय संघटना निर्माण करतात.

3) शस्त्रास्त्र स्पर्धा :⇒ ह्या शीतयुद्धासाठी महाशक्तिच्या राष्ट्रांनी भयानक स्वरुपाची शक्तिशाली अण्वस्त्रे आणि क्षेपणास्त्रे निर्माण केले आहेत. त्याच भितीने अनेक राष्ट्रांना आपली संरक्षण व्यवस्था मजबूत करण्यासाठी अण्वस्त्रे आणि क्षेपणास्त्रे निर्मितीत स्पर्धा वाढली.

4) निःशस्त्रीकरण अपयश :⇒ युद्ध टाळण्यासाठी आणि जागतीक शांतता प्रस्थापीत करण्यासाठी युनो ही जागतीक संघटना शस्त्रकपात आणि निःशस्त्रीकरण योजनांना प्राधान्य देत आहे.

5) युनोचे अवमुल्यन :⇒ विश्वशांतता निर्माण करण्यासाठी युनो ही जागतीक संघटना निर्माण झाली आहे.

Scanned with CamScanner

परंतु महासत्तांच्या राष्ट्रांना सुरक्षा परिषदेत जो नकाराधिकार मिळाला आहे त्याचा उपयोग महासत्तांची राष्ट्रे स्वतःच्या स्वार्थासाठी नेहमीच करतात. ह्यावर कोणतेच बंधन नसल्यामुळे जागतिक शांतता व सुरक्षिततेचे प्रश्न सोडविण्यास युनो असमर्थ ठरली आहे.

६) गुप्त राजनयाला सुरुवात :⇒

महासत्तांची राज्ये आपल्या गटातील सदस्य राष्ट्रांना गुप्तपणे शस्त्रास्त्रे आणि लष्करी मदत देत व त्या राज्यात लष्करी अड्डे निर्माण करते. त्यामुळे अलिप्त राष्ट्रात संदेहाचे वातावरण निर्माण झाले आहे.

## प्रश्न

1) शीतयुद्धाचा विकास आणि जागतीक राजकारणावर झालेले परिणाम ?
2) नवोदित राष्ट्रांचा जागतिक राजकारणावरील परिणाम ?

## संदर्भ


1) आंतरराष्ट्रीय संबंध.
डॉ. वसंत र. रायपूरकर
श्री शिवाजी नगर महाविद्यालय, नागपूर
श्री मंगेश प्रकाशन, सहावी आवृत्ती इ.स. २००७

2) तुलनात्मक शासन आणि राजकारण व आंतरराष्ट्रीय संबंध.
प्रा. डॉ. विमल राठोड, प्रा. डॉ. सुशांत चिमणकर.
अंशुल पब्लिकेशन्स, प्रथम आवृत्ती २०१८